प्रकरण तिसरे

आगरकरांचे समाजसुधारणा, स्त्रीमुक्ती, लोकशाही, राष्ट्रवाद विषयी विचार.

प्रकरण तिसरे

आगरकरांचे समाजसुधारणा, स्त्रीमुक्ती, लोकशाही, राष्ट्रवाद, विषयी विचार

आगरकर हे सामाजिक, राजकीय, धार्मिक सर्वच बाबतीत आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते. जे जे काही आपल्या विवेकबुध्दीला पटले ते ते लोकापवादाची पर्वा न करता निर्भिडपणे समाजाला सांगणे व आपण स्वत: कृतीत उतरविणे हा त्यांचा अपूर्व बाणा होता. रुढीच्या दास्यातून ग्रंथप्रामाण्याच्या बेड्या तोडून बहुजन समाजाची मुक्तता करण्याकरिताच 'सुधारक'चा जन्म होता. विवेकाच्या तर्कनिष्ठ बुध्दीच्या निकषावर पारखलेले, तावून सुलाखून निघालेले सत्य हाच खरा धर्म होय. आपल्या दुर्गुणांची यथायोग्य जाणीव करुन देणे हेच लोकाग्रणीचे आद्य कर्तव्य असे ते म्हणत व या तत्त्वानुसारच त्याची वर्तणूक असे हे असिधाराव्रत त्यांनी आमरण स्वीकारले.

समाज सुधारणा :-

आगरकर हे एक स्वतंत्र बाण्याचे समाज सुधारक, समाजचिंतक होते. भारतीय समाजाच्या सुस्थितीची आणि उत्कर्षाची त्यांना तळमळ होती. महाराष्ट्रातील सुशिक्षितांच्या पूर्वपरंपरेची, तत्कालीन प्रेरणांची व प्रश्नांची त्यांना प्रत्यक्ष माहिती होती. त्यामुळे आपल्या सामाजिक प्रबोधनाला बुध्दिवादी वळण लावण्याचा त्यांनी निश्चय केला.

"समाजाचे कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढी बंधने अपरिहार्य आहेत तेवढी कायम ठेऊन बाकी सर्व गोष्टीत व्यक्तीमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका द्यावयाचा हे अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचे मुख्य तत्त्व आहे व हे ज्यांच्या अंत:करणात बिंबले असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेत अनेक दोषस्थळे वारंवार लोकांच्या नजरेस आणावी ती दूर करण्याचे उपाय सुचवावे आणि युरोपीय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे ते पुन: पुन:

दाखवावे यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे." असे आगरकर समाज सुधरणेबाबत आपले धोरण सांगतात. जन्म सिध्द चातुर्वण्यपध्दती ही या व्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वाशी विरुध्द असल्याने त्यांना ती पसंत नव्हती. आपल्या समाजात मनुष्याला त्याच्या जीवितातील बहुतेक महत्वाच्या बाबतीत स्वातंत्र्य उपभोगता न येता दास्य स्वीकारावे लागते त्याचे धार्मिक व सामाजिक आचार हजारो वर्षाच्या परंपरागत रुढीच्या रुपांनी त्याला जडशृंखलाप्रमाणे बांधून टाकतात, स्त्री पुरुषांचा विवाह बालपणीच होत असल्याने त्याबाबतीतही त्यांना स्वातंत्र्य उपभोगता येत नाही आणि चातुर्वण्यही जन्मसिध्द असेल, तर वृत्तीच्या किंवा धंद्याच्या बाबतीतही त्याला स्वातंत्र्य लाभत नाही. तात्पर्य, विचारस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य, आणि व्यवसायस्वातंत्र्य या बाबतीत व्यक्तीला स्वातंत्र्य असल्याखेरीज व्यक्तीचा विकास होवून त्याला सुख लागणार नाही हे जितके खरे आहे, तितकेच त्याखेरीज अशा समाजाची उन्नतीही होणार नाही व तो समाज प्रगतीपर राहणार नाही असे आगरकरांचे मत होते. मनुष्य जीवनातील तीन प्रमुख पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ व काम हे होत या बाबतीत ज्या समाजातील सर्व व्यक्ती केवळ परंपरेचे अवलंबन करतात, तो समाज प्रगतीपर होणे शक्य नाही. त्या समाजातील प्रत्येक महत्वाच्या बाबतीत आपल्या कर्तृत्वापेक्षा पूर्वीच्या पिढीकडेच पाहणार आणि तिची दृष्टी पुढे न राहता मागेच वळलेली राहणार म्हणून जन्मसिध्द चातुर्वण्य हे समाजाचे स्थितीतत्त्व आहे असे ते म्हणतात. त्याच्या अंगी परंपरागत स्थिती कायम ठेवण्योचे बरेच मोठे सामर्थ्य असले तरी समाजाची प्रगती होण्याच्या दृष्टीनं ते अगदीच कुचकामाचे आहे. अर्थात या बाबतीत आपणास पाश्चात्य समाजाचे अनुकरण करावे लागणार व जन्मसिध्द चातुर्वण्य सोडून द्यावे लागणार असेच आगरकरांचे मत होते.

आपल्या देशात ज्या सुधारणांची वाटाघाट चालली आहे त्या अंमलात आपल्यावर जातीभेद मोडणे, धर्म सुधारणा करणे, मदिरा व मांस यांचे सेवन बंद होणे वगैरे गोष्टीकडे लोकांचे लक्ष लागले पाहिजे. सर्वात सार्वजनिक शिक्षणाची फार

आवश्यकता आहे. हिंदुस्थानातील एकूण एक प्रौढ स्त्री–पुरुषास लिहिला वाचता आले पाहिजे. तसेच प्रत्येक व्यक्तीस चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे. सारांश, वयात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस आपल्या उदर निर्वाहासाठी दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येवू नये. इतकेच नाही तर सहजगत्या उदर–पोषण करता येऊन दिवसाचा काही काळ आत्मचिंतनाकडे, आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे, मनास रुचेल ती करमणूक करण्याकडे किंवा विश्रांतीकडे लावता आला पाहिजे. या सर्व गोष्टी घडून येण्यास किती शतके लागतील हे सांगता येत नाही. पण आगरकरांनी या सुधारणांचे अशा प्रकारे दिग्दर्शन केले होते.[१]

मानवी जीवनांचे वेगळेपणा आणि थोरवी ही त्यातील सुधारणाभिमुखतेत आहे. या सृष्टीतील सचेतन व अचेतन विभागात नित्य काही ना काही घडामोडी चालूच असतात. त्यामुळे एकंदर परिस्थितीत सावकाश पण सातत्याने बदल होत राहतो. कालांतराने भोवतालच्या परिस्थितीत फार मोठे स्थित्यंतर घडून आले की तिच्याशी जुळते घेताना माणसांना आपल्या जीवनसरणीत बदल करावा लागतो. त्यासाठी आपले विचार आणि आचार, श्रध्दा आणि संकेत, सामाजिक संस्था आणि सबंध यांचा फेरविचार आणि नवी मांडणी करणे भाग पडते. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत माणसांना आपल्या नैसर्गिक शक्तीचा पदोपदी उपयोग करावा लागल्याने त्या विकसित होतात. त्यांना आपल्यातील सुप्त सामर्थ्यांचा प्रत्यय येतो आणि त्यांच्या आकांक्षा वाढीस लागतात. त्यामुळे साहजिकच त्यांची उत्तरोत्तर सामाजिक प्रगती होत जाते. अशा तऱ्हेने आगरकरांनी सामाजिक प्रगतीचे स्वरुप स्पष्ट केले आहे. आगरकरांच्या सुधारणावादात सामाजिक जीवनांचा सर्व अंगोपांगाचा समावेश आहे. त्यांना एकमेकांपासून अलग करणे, त्यांचे परस्परावलंबन आणि परस्पर पूरकता यांचे अवधान न राखणे हे त्यांना कधीच उचित वाटले नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

बुध्दिप्रामाण्य महत्वाचे :-

आगरकरांच्या सामाजिक विचारांना राष्ट्रीयत्त्वाचे अधिष्ठान लाभले आहे. त्यावेळी महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळीशी मुख्यत: उच्च वर्णिय बुध्दिजीवी तरुणच समरस झालेले होते. म्हणून या वर्गाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आगरकरांनी आपले सामाजिक तत्त्वज्ञान मांडले. मात्र व्यक्तीची प्रतिष्ठा आणि बुध्दिप्रामाण्य ही त्यांच्या विचारसरणीतील प्रमुख तत्वे समाजातील सर्व थराच्या प्रगतीला उपकारक ठरणारी आहे. तसेच सामाजिक न्यायाचा प्रश्न जेथे उपस्थित झाला, तेथे आगरकरांनी बहुजन समाजाची व अस्पृश्यांची बाजू घेवून उच्चवर्णियांच्या स्वार्थी व संकुचित वृत्तीवर सणसणीत कोरडे ओढले आहेत.

रुढीप्रामाण्य हे त्या काळच्या विचार पध्दतीचे सारसर्वस्व होते श्रध्दाप्रामाण्य, बाबावाक्यांचे प्रामाण्य आणि परंपरेचे प्रामाण्य यामुळे कोणत्याही बाबतीत प्रगतीचे पाऊल पुढे पडणे समाजात असंभव वाटत होते. चुकीचे समज परंपरेमुळे आत्मसात केल्यामुळे तेच तर्कशुध्द आहेत, तेच कल्याणकारक आहेत असे त्यावेळच्या लोकांची पक्की धारणा झाली होती. सुबुध्द लोकही आपल्या आचरणांचे तत्व परंपरा हेच समजत होते. एखाद्यावेळी बुध्दीने एखाद्या वर्तनक्रमातील विसंगती समजली तरी परंपरेविरुध्द आचरण करणे, लोकमताविरुध्द आचरण करणे म्हणजे धर्मविरुध्द आचरण होय असे सुशिक्षित लोकांनाही वाटत होते. धर्मविरुध्द आचरणांचे धैर्य त्यावेळी फार क्वचित लोकांना होते. त्यामुळे सुधारणेची नवीन तत्त्वे आधी पटतच नसत. त्याविरुध्द आधीच हल्ला होत असे. एखाद्याला पटली तर त्यानुसार आचरण करण्याचे मनाधैर्य नव्हते. बहिष्काराची भीती होतीच त्यामुळे लोकांच्या वर्तनक्रमात गतानुगतिकत्व, भीरुत्व, विसंगती आढळत होती अशा रितीने त्या काळात लोकांच्या वागण्यात एक प्रकारची विसंगती होती, भोंदूपणा होता, ढोंगीपणा होता. तो दूर करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. न्याय आणि अन्याय, ईष्ट आणि अनिष्ट यामधील विवेक करावयाचा तो

बुध्दीच्या आणि तर्कनिष्ठ अशा कार्यकारणभावाच्या कसोटीवर केला पाहिजे अशी आगरकरांची अपेक्षा होती.[२]

युक्त व हितकर गोष्टींचा त्यांनी पुरस्कार केलेला आहे. तार्किक विचारसरणीवर आधारलेला बुध्दिप्रामाण्यवाद तत्कालीन लोकांना समजावून देणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. हे पटवून देण्यासाठी त्यांनी विविध विषय हाताळले आहेत. अंधविश्वास, रुढीप्रामाण्याच्या ऐवजी वैज्ञानिक कार्यकारणभावांनी युक्त अशा बुध्दिप्रामाण्यांची स्थापना करण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला.

आगरकरांना राजकीय स्वातंत्र्य, स्वराज्य हवे होते परंतू त्यासाठी त्यांनी समाजजागृती, समाजाची सर्वांगीण सुधारणा, लोकजागृती, लोक शिक्षण हाच मार्ग प्रशस्त मानला व **'सुधारकातून'** ह्याच मार्गाचा प्रसार प्रतिपादन करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. सामाजिक सुधारणावर लक्ष केंद्रीत करण्यात, त्याच एकमेव आहेत किंवा त्या प्राप्त झाल्यावर इतर सुधारणा आपोआप होतील व ह्याच सुधारणा इतर सुधारणांच्या मुळाशी आहेत असे त्यांचे मत नव्हते. मनुष्याच्या सर्व अंगभर पसरलेल्या ज्ञानतंतूच्या जाळ्यातील तंतू ज्याप्रमाणे एकमेकांत गुरफटलेल्या असतात त्याप्रमाणे मनुष्याची सुधारणा करणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रियाप्रवृत्ती एकमेकांपासून विलग नाहीत. इतकेच नाही तर त्यांचा एकमेकांशी निकट संबंध असून त्यापैकी काही परस्परांशी समांतर असतात व काही लंब असतात. अमुक एक सुधारणा केली म्हणजे दुसरे करावयास नको; इतर सर्व गोष्टी ती पासून प्राप्त होतील असे कोणाही खऱ्या विचारी पुरुषास म्हणता येणार नाही. तथापि प्रत्येकालाच सर्व सुधारणा करता येणार नाहीत व त्यात त्याला यशही मिळणार नाही म्हणून ज्याला देशहिताची कळकळ आहे त्याने त्याला जे योग्य वाटत असेल व त्याला जे करता येण्यासारखे असेल त्या सुधारणेचे काम हाती घेतले पाहिजे. श्रमविभागणीच्या तत्त्वाने प्रत्येकाला जे साधेल ते त्याने करावे म्हणजे समाजाची सर्व

बाजूंनी सुधारणा होईल. या सर्व मार्गांचे देशोन्नती होण्यास महत्व सारखे आहे व त्यांची सर्वांची आवश्यकता आहे.[३]

नव समाजनिर्मितीच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या सुधारकांनी शब्दप्रामाण्याच्या तत्त्वाला मुठमाती देऊन त्याजागी बुध्दिप्रामाण्याच्या तत्त्वाची स्थापना करण्याचे उद्दिष्ट प्रामुख्याने आपल्या डोळ्यासमोर ठेवली पाहिजे. ह्या तत्त्वाच्या आधारानेच त्यांनी धर्म, धर्मकल्पना, देवता, देवतोप्तती, मूर्तीपूजा, मंदिरे, आचार, तंत्र, मंत्र, स्नानसंध्या, गंधलेपन, नवस, सोवळेओवळे, भेटी, उपार्जन, प्रेतसंस्कार, सण, जन्ममृत्यू, पूनर्जन्म, यात्रा इत्यादी अनेक बारीकसारीक गोष्टींचा तर्कशुध्द ऐतिहासिक व चिकित्सक विचार करुन त्यात ईष्ट तो बदल करण्यासंबंधी विधायक सूचना केल्या आहेत. त्यात अभिनिवेश असला तरी हट्टाग्रह नाही. आग्रह असला तरी आत्मसंतुष्टता नाही. नुसती कोरडी टीका, टोमणे किंवा उपहास त्यात नाही. प्रतिपक्षावर आघात केले असले तरी त्यात तामसीपणाचा लेशही आढळणार नाही. सहानभूतीने, सहृदयतेने, मुलगामी विचार करुन त्यात कोठे चुकते, का चुकते, ते कसे सुधारता येतील व ते सुधारण्यास कोणता मार्ग हा स्वीकारता येईल याचा पूर्णपणे चिकित्सक दृष्टीने विचार करुन लोकांना नवीन मार्गचे मार्गदर्शन केले आहे. त्यामागे समाजाची, राष्ट्राची सर्वांगीण सुधारणा करण्याची त्याची आत्यंतिक तळमळ व ध्यासच दिसून येतो. नवीन बदल सुचविताना जुन्याबद्दल तिटकारा किंवा जुने संपूर्णपणे टाकून देणे व नवीन संपूर्णपणे स्वीकारणे अशी भूमिका नसून जुन्यातील जे त्याज्य त्याचा त्याग व जे चांगले ते घेवून नवीन तत्त्वातील योग्य तत्त्वाचा स्वीकार करणे अशीच भूमिका आहे. पण त्यागणे व स्वीकारणे ही क्रिया बुध्दिवादाच्या, तर्काच्या आधाराने झाली पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता.[४]

व्यक्तीस्वातंत्र्य :-

व्यक्तीस्वातंत्र्य व समाज बंधन ह्यातील योग्य मर्यादा पाळल्या पाहिजेत परंतू अज्ञानी समाजात स्वत:चे स्वत: कळू लागेपर्यंत सरकारी कायद्याची, सक्तीची जरुरीचे

आहे. सर्व सुधारणा लोकशिक्षणाने होणे शक्य नाही. कायद्याने सहाय्य घेतल्याने समाजाचे कल्याण होणार आहे व त्यामुळे समाजाची सर्वांगीण उन्नती होण्यास मदत होईल असे आगरकर म्हणतात.

व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचे प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, ते आचरण त्या व्यक्तीस घातक असेल तथापि त्याने ते करु नये अशी समाजाने सक्ती करु नये अशी समाजाने सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाही. व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाज बंधन या दोहासही मर्यादा आहेत, या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यापासून एकंदर समाजाचेच नुकसान होणार आहे.

व्यक्तीच्या हितासाठी सामाजिक नियम हे असल्यामुळे अर्थात व्यक्ती विकास हेच त्याचे एकमेव उद्दिष्ट असले पाहिजे. इतरांच्या स्वातंत्र्याला बाधा न येता सामाजिक व्यवहार सुरळीत चालावा म्हणून व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर काही मर्यादा घालणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या आचारांविचारापासून समाजाचे नुकसान नसताना तो आचार विचार बदलण्याची समाजास सक्ती करता येत नाही, त्याचप्रमाणे आधीच जर समाजाने सक्ती केली असेल तर ती नाहीशी करणे हे ही समाजाचे कर्तव्य होय व ते बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधी जे सरकार त्याने पुढे झाले पाहिजे.[५] या ठिकाणी कायद्याचे कार्य हे कोणावर बंधने लादण्याचे नसून समाजाच्या दुर्बळ घटकांचे हिरावून घेतले गेलेले स्वातंत्र्य त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे आहे. या विषयासंबंधी आगरकरांनी विशद केलेला सुधारकांचा हा दृष्टीकोन मुख्यत: व्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय ह्या तत्त्वावर आधारलेला आहे.[६]

आगरकरांच्या सामाजिक विचारसणीचा पायाच मुळी व्यक्ती होता. व्यक्तीसाठी समाज आहे, समाजासाठी व्यक्ती नाही. व्यक्ती हा केंद्रस्थानी मानून समाज, राज्य व इतर संस्था व्यक्तीच्या भोवती तिच्या विकसनासाठी आहेत हा त्यांचा दृष्टीकोन होता. व्यक्ती

हा कुटुंबाचा घटक आहे. त्याप्रमाणे कुटुंबे राष्ट्राचे घटक आहेत. कुटुंबे सुधारल्याखेरीज राष्ट्रसुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधीच व्हावयाची नाही असे त्यांचे मत असल्यामुळे त्यांनी कुटुंब सुधारणेकडे अधिक लक्ष द्यावे हे स्वाभाविकच आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला, घटकाला स्वातंत्र्य, समानता व व्यक्तीमत्व सुधारण्याची समान संधी मिळणे आवश्यक आहे, अशी त्यांची कुटुंब सुखाविषयी धारणा होती. राष्ट्राची खरी मजबूती कौटुंबिक संबंधातील निकोपपणा यावर सर्वथैंव अवलंबून आहे. म्हणून आपली गृहस्थिती सुधारल्याखेरीज आपली राजकीय स्थिती कधीच सुधारणार नाही. व्यक्तीस्वातंत्र्य, संधिसमानता, परमतसहिष्णूता इत्यादी तत्वांचा आपण उदोउदो करतो, पण आपल्या गृहजीवनात मात्र विषमता, गुलामगिरी, गतानुगतिकत्व, असहिष्णुता व जुलूम यांचे प्राबल्य आहे. आपल्या घरच्या व्यवहारात या तत्वांचा प्रवेश झाल्याखेरीज राष्ट्राच्या उभारणीत त्यांना यथोचित वाव मिळण्याचा संभव नाही. समाजाचा चांगुलपणा हा अखेरीस त्यातील नागरिकांच्या स्वभावाची घडण कशी होते यावर अवलंबून असतो. उत्तम नागरिकांच्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या गुणांची जोपासना मुख्यत: लहानपणी त्यांच्या मनावर होणाऱ्या संस्कारातून करता येते. तेंव्हा समाजकल्याणाचे मूळ कुटुंबकल्याणात आहे ही विचारसरणी आगरकरांना ग्राह्य वाटत होती.

सामाजिक ऐक्याचे महत्व :-

समाजाच्या वेगवेगळ्या घटकात एकोपा व बंधूभाव वसत असेल तरच तो समाज हा बलवान व कर्तृत्वशाली बनतो. एकजिनसी समाज अधिक बलिष्ठ असतो. कारण आपल्या घटक व्यक्तीच्या अंगी ज्या मानसिक शक्ती असतात त्यांचा विकास करण्याची संधी तो सर्वांना देत असतो आणि ह्यामुळे कुणाही व्यक्तीच्या शक्ती सुप्त राहून वाया जात नाहीत. शिवाय अशा समाजात स्वाभाविकपणे एकोपा अधिक असतो. जातीसंस्थेवर आधारलेल्या समाजाचे स्वरुप ह्याच्या नेमके विरुध्द असते. तो अवरुध्द व बंदिस्त

असतो. आगरकर म्हणतात, 'जातीमुळे आपला देशाभिमान किती संकुचित झाला आहे; जातीमुळे ज्ञान, कला, शास्त्रे वगैरे जेथल्या तेथे कशी कोंडल्यासारखी झाली आहेत, जातीमुळे धर्मविचारात व आचारात किती मतभेद उत्पन्न होवून तो परस्पर वैरास, छळास व मत्सरास कसा कारण झाला आहे, जातीमुळे अन्न व्यवहार, विवाह वगैरेच्या संबंधाने किती गैरसोय झाली आहे, जातीमुळे देशातल्या देशात प्रवास करणे किती कठीण झाले आहे, जातीमुळे परव्दीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग रहावे लागत असल्यामुळे केवढे नुकसान होत आहे, जातीमुळे आमची भूतदया, आमचे बंधूप्रेम, आमची उदारता, धर्मबुध्दी, आमची परोपकाराती आमचे विचार यांचे क्षेत्र किती मर्यादित झाली आहे ! याची या थोर सुधारकांच्या मनात खरी कल्पना कधी येत नाही काय?..... येथून पुढे जो या देशात नवीन जात काढण्याचा प्रयत्न करील तो त्याचा हितचिंतक न समजता दृष्ट शत्रुच समजला पाहिजे.'[७]

असे जातीभेदाविरुध्द कळकळीचे व उव्देगाचे उद्‌गार आगरकरांनी काढले व तो भेद नष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे ह्याचे प्रतिपादन त्यांनी वारंवार आपल्या लेखातून केले. अशा तऱ्हेने जाती संस्थेचे दुष्परिणाम आगरकरांनी आपल्या निदर्शनास आणून दिले आहेत. जाती संस्थेतील भेदभावाचे पोषण करुन सामाजिक व्यवहाराचे क्षेत्र आकुचित करणारी धर्मकल्पनाच मुळात हिणकस व संस्कारजड आहे. अशी आगरकरांची भावना होती. म्हणून वर्णसंकर झाला पहिजे ज्याला पाहिजे त्याबरोबर अन्नोदक व्यवहार करण्याची किंवा लग्न करण्याची सदर परवानगी मिळाली पाहिजे, हव्या त्या शास्त्राचा व धर्मग्रंथाचा अभ्यास करण्याची सर्वांना मोकळीक दिली गेली तर ती धर्मग्लानी न मानता त्याला धर्मोत्कर्षच म्हटले पाहिजे असा त्याचा असंदिग्ध अभिप्राय आहे.

अस्पृश्यतेवरील आगरकरांची टीकाही ही चाल अविवेकी आहे ह्या मुद्यांवर आधारलेली आहे. ते म्हणतात, खालच्या वर्गातल्या लोकांच्या ठायी जो इतकी अपवित्रता व अस्पृश्यता मानली आहे ती कितपत संयुक्तिक आहे याचा विचार करावा.

अस्पृश्य ठरवल्या गेलेल्या जातीतील व्यक्तीसाठी तर जातीव्यवस्था ही आगरकरांच्या मते सर्वाधिक जाचक ठरते. अस्पृश्यतेच्या प्रथेतील क्रौर्य, अन्याय, मुर्खपणा आणि विचारशून्यता आगरकरांनी भेदकपणे स्पष्ट केली आहे. समाजाची घाण उपसून आरोग्य सांभाळणाऱ्या वर्गांना त्यांचा आहार-आचार गलिच्छ ठरवून समाजाने दूर ठेवावे हा त्यांना अत्यंत निंद्य व अन्याय प्रकार वाटतो. समाजाच्या विलक्षण रहाटीमुळे उच्च-निचत्व अस्तित्वात येऊन तद्नुसार जो व्यवसाय विभाग सहजगत्या झाला आहे. त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गात जन्मास आलेल्या लोकांनी नीच वर्गात जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र, अस्पृश्य मानणे याहून मनुष्याच्या विचारीपणास लांच्छनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही. असे आगरकर म्हणतात. अस्पृश्यता निवारणाकडे पाहण्याची आगरकरांची दृष्टी निव्वळ भूतदयेची नव्हती. समाजाचे घटक म्हणून अस्पृश्य जातींना आपण बरोबरीच्या नात्याने वागवले पाहिजे. त्यासाठी आधी आपल्या लौकिक व्यवहारातील भेदभाव व पंक्तीप्रपंच समूळ नाहीसा करुन आपल्या सामाजिक जीवनाची घडी **'समतेच्या तत्त्वावर'** नव्याने बसविली गेली पाहिजे असे त्यांचे मत होते.

जातीभेदामुळे आपल्या सामाजिक प्रगतीच्या मार्गात पदोपदी अडथळे येतात म्हणून त्याचे बंड कमी करण्याची वेळ आलेली आहे. याबद्दल त्यांच्या मनात तिळमात्र संदेह नव्हता. व्यक्तीसाठी समाज असतो. समाजासाठी व्यक्ती नव्हे हे लक्षात ठेवूनच व्यष्टिसमष्टि संतुलनाचा विचार झाला पाहिजे. समाजात एक जिवंत व स्वयंपूर्ण एकक म्हणून व्यक्तीला तिच्या योग्यतेनुरुप पुरुषार्थ गाजविण्याची संधी मिळालीच पहिजे यावर त्याचा कटाक्ष होता. जन्मासारख्या सर्वस्वी यादृच्छिक घटनेने व्यक्तीचे समाजातील स्थान निर्धारित करणारी जातीव्यवस्था आगरकरांच्या मते व्यक्तीवादाच्या निकषावरही असमर्थनीय ठरते. सर्व मानवप्राणी जन्मास येताना सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्याचे हक्कही एकसारखे असतात व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणे हे केवळ त्यांच्या कमी अधिक बुध्दिविकासावर, उपयोगशिलतेवर अवलंबून आहे असे प्रतिपादन

आगरकरांनी जातीव्यवस्थेवर टीका करताना केलेले आहे. आगरकरांनी जन्माधिष्ठीत जातीव्यवस्था व धर्मसंस्था यामुळे व्यक्तीविकास कसा खुंटला आहे याचे सडेतोड वर्णन केले असून यात जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत समाजाला सुख लाभण्याची आशा नाही असे निक्षून बजाविले आहे.

स्त्री स्वातंत्र्य :-

१ ऑगस्ट, १८८८ या दिवशी **'सुधारक'** या आगरकरांच्या साप्ताहिकासंबंधीचे एक जाहीर पत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. 'सुधारक' सुरु करण्याचा उद्देश काय? आणि त्यामध्ये प्रसिध्द होणाऱ्या साहित्याचे स्वरुप कसे असेल? या संबंधीची माहिती या पत्रकात आहे. जनमानसात वैचारिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी वृत्तपत्र हे एक प्रभावी माध्यम आहे या विश्वासाने सुधारकाचा जन्म झाला. अशा प्रकारे पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात गंभीरपणाने उतरणाऱ्या सुधारकासंबंधीच्या पहिल्याच जाहीर आवाहनात श्री. आगरकर जाहीर करतात; सुशिक्षितात स्त्रियांना स्त्रीशिक्षणादी विषयांवर आपले मत प्रकट करता यावे व वाचकांसही ते वाचण्यास मिळावे, म्हणून स्त्रीलिखित लेखाकरिता स्वतंत्र स्थल राखून ठेवण्याची आम्ही योजना केली आहे. आजच्या नामवंत वृत्तपत्रामध्येही स्त्रिया आणि मुले यांना एकदा वाढले जाते! या वस्तुस्थितीच्या तुलनेत आगरकरांच्या सुधारकांमध्ये शंभर वर्षापूर्वीसुध्दा स्त्रियांना अधिक गंभीरपणे आणि समतेच्या तत्वानुसार जागा आणि दर्जा देण्यात आला याची नोंद करावीशी वाटते.[८]

स्त्री दु:खाविषयी सहानूभूती, अन्यायाची चीड, न्याय मिळवून देण्याची जिद्द, व समाज रचना निकोप असावी हा ध्यास यांच्या संमिश्र भावनातून आगरकरांनी स्त्री जीवनाचा सूक्ष्म अभ्यास व निरीक्षण करुन स्त्रीजीवनाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक उपाय हे सूचविलेले आहेत.

याची सुरुवात आगरकरांनी कुटुंबापासून केलेली आहे. माणसांच्या परस्परसंबधांची खरी सुरुवात घरापासून होते. कौटुंबिक जीवनातून होते ज्याप्रमाणे व्यक्ती कुटुंबाचा घटक आहे त्याप्रमाणे कुटुंब राष्ट्राचे घटक आहेत. कुटुंब सुधारल्याखेरीज राष्ट्रसुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधीच व्हावयाची नाही. असे आगकरांचे मत असल्यामुळे त्यांनी कुटुंब सुधारणेकडे अधिक लक्ष द्यावे हे स्वाभाविकच होते. व्यक्ती स्वातंत्र्य, संधिसमानता, परमतसहिष्णूता इत्यादी तत्वांचा आपण उदोउदो करतो, पण आपल्या गृहजीवनात मात्र विषमता, गुलामगिरी, गतानुगतिकत्व, असहिष्णूता व जुलूम यांचे प्राबल्य आहे. आपल्या घरच्या व्यवहारात या तत्वांचा प्रवेश झाल्याखेरीज राष्ट्राच्या उभारणीत त्यांना यथोचित वाव मिळण्याचा संभव नाही. तेंव्हा अगोदर घरातील गुलामगिरी नाहीशी करण्याचा प्रयत्न केला पहिजे पण पुराणप्रियतेमुळे आपण आपल्या रुढ चालिरितीची छाननी करण्यास धजत नाही. पिढ्यानपिढ्या चालत आलेले आहे तेच ईष्ट व हितप्रद असे धरुन चालतो. शिवाय आपल्या सामाजिक मूल्यसरणीत व्यक्तीच्या अंत:प्रेरणेपेक्षा कुळाची प्रतिष्ठा व कुटुंबाचे स्थैर्य यांना अधिक महत्व दिले गेले आहे. त्यामुळे आपल्या गृहव्यवस्थेत कुटुंब प्रमुख हाच सर्व सत्ताधीश; बाकीच्या माणसांनी गुलामाप्रमाणे त्याच्या आज्ञा शिरोधार्य मानल्या पाहिजेत. संसारात पती हा घरधनी आणि पत्नी ही त्याची दासी. स्त्री मग ती कन्या, पत्नी किंवा माता यापैकी कोणतीही भूमिका वठवीत असो, तिने पिता, पती अथवा पुत्र यांच्या छत्राखाली निमूटपणे नांदले पाहिजे. अशा भेदमूलक साचेबंद कौटुंबिक जीवनातून देशाच्या उत्कर्षाला हातभार लावणारे स्वतंत्र प्रज्ञेचे कर्तबगार व पराक्रमी स्त्री पुरुष कसे निर्माण होणार? या प्रश्नांवरुन आगरकर ज्या व्यापक परिवर्तनाचा विचार डोळ्यासमोर ठेवून लिहित होते, त्यांचा कुटुंब हा ते पायाभूत प्रारंभ मानत होते. कुटुंबाची स्थिरता स्त्री –पुरुष नात्यावर अवलंबून असते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती मग ती स्त्री असे वा पुरुष त्या व्यक्तीला स्वातंत्र्य, समानता, व व्यक्तीमत्व सुधारण्याची समान संधी मिळणे आवश्यक आहे. अशा प्रकारे स्त्री–पुरुष नात्यातील समता, संमती, स्वातंत्र्य या मूल्यावर आगरकरांचा कटाक्ष होता.

विवाहसंस्था हा कुटुंबव्यवस्थेचा आधार होय. ज्या प्रमाणे समाजाचा घटक कुटुंब ही असतात, त्याप्रमाणेच कुटुंबाचे घटक हे स्त्री पुरुष होत. विवाहामुळे स्त्रीला सुखप्राप्ती होण्यापेक्षा उलट तिच्या जीवनात अनर्थ परंपराच सुरु होत होती. तिच्या बाल्यावस्थेत विवाह म्हणजे काय हे कळण्यापूर्वीच तिच्या विवाह वेदीवर बळी दिला जात असे. त्या काळात विवाह जर विषम विवाह असला तर स्त्री ही अल्पवयीन बालिका तर पती हा अनेकवेळा साठी ओलांडलेला जरठ वुध्दा असावयाचा. अशा विवाहात पतीच्या स्वाभाविक निधनाने जर तिला वैधव्य प्राप्त झाले तर तिच्या दु:खाला अंतच नसे. तिला जबरीने केशवपन तर असेच! ह्या दोन्ही क्रूर व अमानुष चालीविरुध्द आगरकरांनी **'सुधारकांतून'** अनेक कठोर हल्ले केलेले होते.

बालविवाह, विषमविवाह, स्वयंवर, संततीनियमन, घटस्फोट इत्यादी विषयांचा आगरकरांनी जो ऊहापोह केला आहे त्यात सर्वत्र त्यांची व्यक्तीवादी दृष्टीकोन प्रतिबिंबीत झालेला आहे. ज्यांची शारिरीक व मानसिक वाढ झालेली नाही, विवाहाचे पावित्र्य व जबाबदारी समजण्याची ज्याच्या ठिकाणी बौध्दिक कुवत नाही, अशा मुलांमुलींच्या मानेवर संसाराचे जोखड लादल्याने त्यांचे त्यांच्या स्वत:वर, संततीवर आणि समाजावर किती दुष्परिणाम होतात ते आगरकरांनी जागोजागी स्पष्टपणे दाखवून दिले आहे. मात्र विवाहाचे बरे वाईट परिणाम ही गोष्ट महत्वाची असली तरी आगरकरांचा मुख्य भर वधूवरांना आपला जोडीदार निवडण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे या मुद्यावर आहे. बालविवाहाला त्यांचा जो विरोध होता तो तात्त्वीक होता. या चालीमुळे स्वातंत्र्याच्या, संमतीच्या, स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला बाधा येते हा आगरकरांचा मुख्य आक्षेप होता.

१५-१६ वर्षाच्या आत मुलीचे आणि २०-२२ वर्षाच्या आत मुलाचे लग्न होण्याचे जोपर्यंत बंद झाले नाही, तोपर्यंत आपण बालविवाहाच्या दुष्ट रुढीच्या तावडीतून सुटलो असे म्हणता येणार नाही, असे आगरकर म्हणतात. पण हे त्याकाळी सहजासहजी घडणे अशक्य होते. पण या बालविवाहाच्या समस्येवर **'संमती वयाचा कायदा'** झाला. या

संमतीवयाच्या कायद्यास आगरकरांनी पाठींबा दिला. **"तेरावे वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही मुलीचे लग्न करु नये व तेरावे वर्ष लागण्यापूर्वी बायकोकडे तिच्या नवऱ्याने जावू नये."** या दोन निर्बंधापैकी पहिला समाजास विशेष हितकारक आहे हे उघड आहे. तथापि ज्या अर्थी लग्नाच्या वयाची इयत्ता ठरविणे म्हणजे आमच्या धर्मात हात घालणे व लोकमताविरुध्द जाणे अशी सरकारास आजमितीस भिती वाटत आहे, त्या अर्थी संमतीच्या वयात ते आज जेवढा फेरफार करण्यास तयार झाले आहे. तेवढ्यातच समाधान मानून घेतले पाहिजे. असा आगरकरांचा त्यावेळी युक्तीवाद होता.[९]

संततीनियमन प्रश्नांच्या बाबतीत आगरकरांची भूमिका तत्वानुसार होती. संसाराचा भार कमी होवून स्त्रियांना आत्मविकासाची संधी मिळावी असे वाटत असेल तर आपले कुटुंब आटोपशीर ठेवण्याची पुरुषांनी दक्षता घेतली पाहिजे. विवाहाच्या कामी स्त्री –पुरुषांची संमति जितकी अवश्य आहे, तितकीच संमती विवाहाच्या अमलातही दृष्टीस पडू लागली पाहिजे. अशी आगरकर रास्त अपेक्षा बाळगतात. विषमविवाहात तर केवळ अन्यायच नव्हे तर निदर्यपणाही आहे. विवाहविधीतील मांगल्याची विटंबना करणाऱ्या या दुष्ट चालीचे कोणत्याही प्रकारे समर्थन होवू शकत नाही या चालीस मान्यता देणाऱ्या पुराणमतवाद्यांवर आगरकरांनी कठोरपणाने कोरडे ओढले आहेत.

बालविवाहाचाच एक दुष्परिणाम म्हणजे अज्ञानपणी आई –बापांनी केलेले लग्न मान्य न होणे. त्यावेळी स्त्रीला जर घटस्फोट हवा असेल तर तो कायद्याने देण्यात यावा असे आगरकरांनी प्रतिपादीत केलेले आहे. केसरीचे संपादक असतानाच **"दादाजी विरुध्द रखमाबाई"** हे घटस्फोट प्रकरण गाजले होते. त्यावेही आगरकरांनी स्त्री स्वातंत्र्याचा पक्ष घेवून रखमाबाईचे समर्थन केले होते. त्याच प्रकरणातील समस्याचा विचार करुन आगरकरांनी घटस्फोटाचे समर्थन केलेले होते.

पुनर्विवाह, केशवपन, सहगमन, गतभर्तृकेची आत्महत्या इत्यादी विषयाची चर्चा करताना आगरकरांनी समता व संमती या तत्त्वांचा प्रामुख्याने पुरस्कार केला. पहिली पत्नी

कालवश झाल्यानंतर जर पुरुषाला दुसरे लग्न करता येते, तर स्त्रीलाही पतिनिधनानंतर तिची तशी इच्छा असल्यास पुनर्विवाहाची मोकळीक असली पाहिजे असे आगरकरांसारख्या बुध्दिवादी सुधारकांचे म्हणणे होते. स्त्रीच्या बाबतीत एक न्याय आणि पुरुषाच्या बाबतीत दुसरा न्याय हे दुगल पक्षपाती धर्मशास्त्र त्यांना मुळातच मान्य नव्हते. आपल्या समाजात धर्माच्या नावाखाली हतभागी गतभर्तृवर पुन्हा लग्न न करता अखेरपर्यंत संन्यस्त वृत्तीने राहण्याची सक्ती करण्यात आली होती. ती काढून टाकणे एवढाच पुनर्विवाहाच्या चळवळीचा उद्देश आहे. आपल्या समाजात रुढीचे अवास्तव वर्चस्व असल्याने अजूनही पुनर्विवाहास लोकमत पुष्कळच प्रतिकूल आहे. लोकमताचा हा अडथळा नाहीसा करण्यासाठीच सुधारकांची धडपड आहे आणि ती मनुष्यतेच्या ऐच्छिक सुखसंवर्धानाच्या सार्वत्रिक धर्माशी सुसंगत आहे. पुनर्विवाह करणे वा न करणे हा त्या त्या व्यक्तीच्या इच्छेचा प्रश्न आहे असे आगरकरांचे म्हणणे होते. निराधार व शोकमग्न झालेल्या गतभर्तृकेचे केशवपन करुन तिला विद्रुप करणाऱ्या या निंद्य व अमंगळ चालीचे ताबडतोब निर्मूलन झाले पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता. त्यासाठी कायद्याचे सहाय्य घेण्याचीही तयारी त्यांची होती. आगरकरांच्या या मत प्रतिपादनात व्यक्तीस्वातंत्र्याचे तत्वच अनुस्युत आहे.

हतभागी गतभर्तृकांना त्यांच्या भोवतालचे लोक सहानूभूतीने व न्याय बुध्दीने वागवू लागले, पुनर्विवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात रुढ झाली, हवे तितके शिक्षण घेवून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनण्याची त्यांना संधी मिळत गेली, खुळ्या धर्म समजुती लयास जावून कौटुंबिक गुलामगिरीविरुध्द त्याच्या मनात चीड उत्पन्न झाली, आपल्या स्वतंत्र व्यक्तीत्वाची त्यांना ओळख पटून त्यांच्या ठिकाणी आत्मविश्वास निर्माण झाला, तर मग सहगमन करणारी व आत्महत्येस प्रवृत्त होणारी विधवा आपल्या समाजात चूकुन देखील दृष्टीस पडणार नाही. असे भविष्य युगतत्त्ववेत्या आगरकरांनी वर्तविली होते.[१०]

शिक्षणचा, विशेषत: स्त्री शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याखेरीज समाजाची सर्वांगिण प्रगती होणार नाही अशी आगरकरांची भावना होती. म्हणून मुलांच्याप्रमाणे मुलींचेही प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे असे त्यांचे मत होते. स्त्रीला शिक्षण देणे आवश्यक आहे. तेही मुलांप्रमाणेच शिक्षण देणे आवश्यक आहे. तेही मुलांप्रमाणेच शिक्षण द्यावे व मुलामुलींना एकत्र द्यावे, तसेच स्त्रीला वरिष्ठ प्रतीचे शिक्षण हितावह आहे असे विचार आगरकरांनी स्त्रीशिक्षण व स्त्रीसुधारणेबाबत प्रतिपादीत केले आहे. स्त्रियांनी व पुरुषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करावा, पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी, पाहिजे त्या परिक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्यात आणि पाहिजे तेंव्हा लग्न करुन हवा तसा संसार करावा, अशी मोकळीक कालांतराने सर्वांना मिळणार आहे, असे आगरकरांनी आत्मविश्वासाने व निश्चितपणे सांगितले होते.

स्त्रियांची विचारशक्ती पुरुषांच्यापेक्षा कमी प्रतीची आहे हा सिध्दांतच निराधार आहे असे आगरकरांची खात्री होती. तेंव्हा शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यास स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील पण अनुभवाने तसे ठरतोपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणे हा शुध्द सुल्तानी दांडगेपणा होय. अशा कडक भाषेत आगरकरांनी आपल्या विरोधकांचा समाचार घेतला आहे.

आपला नैसर्गिक कल व क्षमता यांना अनुसरुन स्त्रियांना आपल्या व्यवसायाची निवड करण्याची पूर्ण मुभा असली पाहिजे. आपले रुढ सामाजिक संकेत त्याच्या स्वातंत्र्याच्या आड येता कामा नयेत. स्त्री –पुरुषांच्या कामाची आपली परंपरागत विभागणी आधुनिक शास्त्राला धरुन आहे असे दाखविण्याचा कित्येकदा प्रयत्न केला जातो, पण तो निरर्थक आहे. "पुरुषाच्या मेंदूपेक्षा स्त्रियांचा मेंदू सरासरीने कमी वजनाचा आहे. स्त्री –पुरुषामधील कामाची वाटणी त्यांच्या मेंदूच्या वजनावर अवलंबून असावी हे योग्य असे जरी मानले तरी साऱ्या पुरुषांचे मेंदू साऱ्या स्त्रियांच्या मेंदूपेक्षा अधिक जड आहे असे प्रतिपादण्याचे धारिष्ट्य अत्यंत अधिकारलोलूप पुरुषासदेखील करता येणार नाही.

अनेक स्त्रियांचे मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यात संशय नाही. तेंव्हा मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनी अमुक कामे करावी व पुरुषांनी अनेक कामे करावी असा निर्बंध करणे शुध्द अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जे काम साधेल त्याने ते करावे अशी प्रत्येकास मोकळीक देण्यात ते करणाऱ्याचा अथवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे. ज्या कामास जे पुरुष बुध्दिसामर्थ्याने योग्य नाहीत. त्यांच्याकडून ती कामे होत असल्यामुळे व स्त्रियांस ती करण्याची परवानगी नसल्यामुळे एकंदरीत ती काम व्हावीत तशी होत नाहीत, व तसे न झाल्यामुळे मनुष्य जातीच्या सुखास चट्टा बसत आहे. हर एक शास्त्रात कलेत व धंद्यात स्त्री पुरुषाची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरुप व्यवस्था लागली पाहिजे." आगरकरांनी अशा प्रकारे स्त्रियांच्या व्यवसाय स्वातंत्र्याची तरफदारी केली आहे. मात्र शास्त्र कलांच्या अभ्यासामुळे स्त्रियांचे नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्य संगोपनाचे काम त्याच्याने बरोबर वठेनासे होईल ही जी भिती आहे ती निराधार आहे असे आगरकर म्हणतात.

अशा प्रकारे आगरकरांनी स्त्री पुरुष संबंध हे स्वातंत्र्य, समता, संमती या समानतेच्या आधारावर उभे राहिले पाहिजेत आणि स्त्री सुधारणेशिवाय सामाजिक प्रगती शक्य नाही असे वर्तविले होते.

सुधारणेची पध्दत :-

जुन्या विचारांचे उच्चाटन आणि नव्या विचारांची स्थापना असे दुहेरी कार्य समाज सुधारकांनी साधावयाचे असते त्यासाठी "साम आणि संग्राम" अशा दोन्ही मार्गाचा अवलंब करावा लागतो. सामोपचाराने कार्यसिध्दी होत असेल तर संघर्षाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वास्तविक पाहता केवळ बदलासाठी बदल करणे म्हणजे सुधारणा नव्हे. जो बदल करावयाचा तो क्रमप्राप्त व कल्याणप्रद असला पाहिजे. या दृष्टीने कोणतीही नवी गोष्ट पुढे आली तर ती व्यक्तीच्या हिताला आणि सामाजिक प्रगतीला पोषक आहे की नाही याची शहानिशा केल्याखेरीज लोकांनी तिचा स्वीकार करु नये असा सुधारकांनी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आग्रह धरला पाहिजे. निरनिराळ्या प्रश्नासंबंधीची आपली भूमिका त्यांनी युक्तीवादाने लोकांना पटवून देण्याची शिकस्त केली पाहिजे. मात्र प्रांजल युक्तीवादाची मात्रा सदोदीत लागू पडतेच असे नाही. जुन्या पिढीतील बऱ्याचशा लोकांचे पूर्वग्रह इतके प्रबळ असतात की त्यांना नव्या प्रवृत्तीची खुल्या दिलाने दखल घेता येत नाही. साहजिकच त्यांचे मत परिवर्तन करणे अशक्य होवून बसते. अर्थातच मग संघर्षाचा पवित्रा घेऊन त्यांच्या जुन्या पुराण्या अनर्थकारक समजुतीवर कठोरपणाने प्रहार करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या विचारात काही फरक पडतो असे नाही, पण अशा टीकेमुळे चिंतनशील तरुणांची न्यायबुध्दी आणि विवेकशक्ती जागृत होऊन पुराणमतवादातील विसंगती व दोष स्थळे त्यांच्या ध्यानात येतात. शिवाय जुन्या-नव्या मत प्रणालीच्या संघर्षामुळे सामाजिक सुधारणेच्या चळवळीची वैचारिक बैठक किती शुध्द, व्यापक आणि सुस्थिर आहे याची कसोटी लागते. आणि जनमाणसात सुधारणेच्या कार्याबद्दल आस्था निर्माण होते. हे आगरकरांचे समाज सुधारणेबद्दलचे मूळ पायाभूत तत्व होते.

स्वराज्याचा पुरस्कार :-

राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशात ऐहिक सुखाची परमावधी व्हावयाची नाही. राजकीय हक्क संपादण्यासाठी जे करणे असेल तेच आम्ही केले पाहिजे जातीभेद नाहीसा झाला पाहिजे, स्त्री पुरुषांच्या ज्ञानात व स्वातंत्र्यात जेवढे अंतर राहून देणे अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाही म्हणून स्त्रियांची उन्नती करण्याबद्दल रात्रंदिवस झटले पाहिजे, नीतीप्रसार, संपत्यत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळे लोकशिक्षणाचे काम जितके झपाट्याने चालवेल तितक्या झपाट्याने चालविले पाहिजे. लोकांना आज अप्रिय परंतू अंती पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुध्द पुन्हा पुन्हा त्यांच्यापुढे आणणे हेच आपले कर्तव्य व जीवनाचे सार्थक ही आगरकरांची भूमिका होती.

आगरकरांनी सामाजिक सर्वांगिण सुधारणा स्वराज्य प्राप्तीचा एक मार्ग म्हणून स्वीकारल्या, परंतू सामाजिक सुधारणाच सर्वस्व आहेत, त्या इतर सुधारणांच्या मुळाशी आहेत त्या प्राप्त झाल्या की राजकीय व इतर सुधारणा आपोआप प्राप्त होतील असे त्यांनी केव्हाही प्रतिपादन केले नाही. 'सुधारका'तून सामाजिक सुधारणावर लक्ष केंद्रीत करताना राजकीय क्षेत्रातील आगरकरांचे अवधान जराही ढळले नव्हते.[११]

आगरकर हे बुध्दिप्रामाण्यवादी व व्यक्तीस्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते होते. व्यक्ती स्वातंत्र्याबद्दल त्याची भूमिका व्यापक होती. समाजातील व्यक्तीचे परस्परांशी संबंध समतेच्या उदार तत्वावर अधिष्ठीत झाले पाहिजेत असे त्यांचे मत होते.

स्वातंत्र्य व लोकशाही :-

आगरकर म्हणतात की, प्रगतीची दिशा ही अधिकाधिक वैयक्तिक स्वातंत्र्याकडे असते. एखाद्या समाजातील व्यक्तींना जितक्या अधिक प्रमाणात स्वातंत्र्य लाभलेले असेल तितक्या अधिक प्रमाणात त्या सुखी असतील. दोन कारणामुळे, एकतर स्वातंत्र्य स्वत:च सुखावह असते. दुसरे कारण असे की, समाजात जर एखाद्या वर्गाला इतरांचे दिग्दर्शक करण्याचा व नियंत्रण करण्याचा अधिकार असेल तर हा वर्ग स्वाभाविकपणे स्वत:च्या हितसंबंधाचा पाठपुरावा करील व त्यासाठी इतरांच्या सुखाचा बळी घ्यायला मागेपुढे पाहणार नाही. पण समाजातील सर्व व्यक्तींना जर निर्णय स्वातंत्र्य असेल तर ते स्वत:चे सुख ज्या योगे साधले जाईल अशा धोरणाचा व कृत्याचा पुरस्कार करील असे करण्यात ते काही चुका करतील पण अनुभवाने त्या सुधारतील. जेव्हा समाजात ज्या प्रमाणात व्यक्ती स्वातंत्र्य अधिक विखुरलेले असेल त्या प्रमाणात त्या समाजातील अधिक व्यक्ती सुखाच्या धनी असतील. "**जोपर्यंतं कोणत्याही राष्ट्राच्या लोकसमूहात स्थूल मानाने स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊन राहिलेले असतात तोपर्यंत त्यात सुखावस्थेची परमावधी होण्याचा संभव नाही.**" सुधारणेचा जो "**अनिवार्य काल**" आगरकरांना दिसतो तो असा की, व्यक्ती स्वातंत्र्याच्या इच्छेने मूळ धरले की हळूहळू अधिकाधिक लोकांना स्वातंत्र्य

मिळत जाईल. "**स्वामी आणि किंकर**" हा भेद क्षीण होत जावून लोप पावेल, कुणी कुणाच्या आधीन, ताब्यात असणार नाही, कुणी कुणावर सक्ती करु शकणार नाही. आणि व्यक्ती-व्यक्तीमधील व्यवहार परस्पर संमतीने होत जातील. "तात्पर्य काय की, बलात्कार, जबरदस्ती, बळजोरी, शक्ती इत्यादी शब्दांनी व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहारापासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळे तसले व्यवहार नाहीसे होत असून त्यांच्या जागी संयम, संमती, अनुरोध, रुकार, पसंती इत्यादी शब्दांनी व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहाराचा प्रचार सर्वत्र घडत आहे. तेंव्हा येथून पुढे राजा व प्रजा, कुलेश व कुलावयेन, पती आणि पत्नी, माता पितरे व अपत्ये, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यातील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्काराने न होता संमतीपूर्वक होत जाणार आहेत." असे आगरकरांनी आपल्या '**व्यक्तीस्वातंत्र्य**' विचारपध्दतीचे सूत्र स्पष्ट केलेले आहे.

स्वातंत्र्याची प्रेरणा आणि स्वत:चे सुख साधण्याची प्रेरणा अशा दुहेरी मानवी प्रेरणा आहेत असे आगरकर म्हणतात . स्वातंत्र्य, स्वभावत:च सुखद असल्यामुळे मनुष्याला स्वसुख साधण्याची एकमेव प्रेरणा असते असे म्हणता येईल. पण स्वातंत्र्याला महत्व आहे; कारण स्वत:चे सुख साधण्याची ती अनिर्वाय अट आहे, आवश्यक असे साधन आहे. समाजात स्वातंत्र्य अधिकाधिक पसरत जाणे म्हणजे समाजाची प्रगती होणे[१२] असे आगरकर प्रतिपादतात.

आगरकर हे राजकीय स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. सामाजिक क्षेत्राप्रमाणेच त्यांना राजकीय क्षेत्रात सुधारणा आणि विकास अभिप्रेत होता. आगरकरांच्या मते, राजसत्ता राजाकडून काही सरदार कुलांकडे संक्रमित होते, पण त्यातही नंतर बदल होतो आणि ती जनतेच्या हाती येते. युरोपात काही राष्ट्रात लोकशाही परिस्थिती आहे. तेथे अनेकसत्तात्मक राज्य आहे. आशियाई देशात मात्र एकसत्ताक राजतंत्रच प्रबळ आहे. युरोपातील देशात अनेकसत्तात्मक लोकशाही असली तरी त्या लोकशाहीचा फायदा

आशियातील वसाहतीत राहणाऱ्या लोकांना होत नाही. आज जरी एकसत्तात्मक राज्ये संख्येने जास्त असली तरी आगरकरांना अशी खात्री वाटत होती की कालांतराने युरोपात तर लोकशाही राजवट स्थापन होईलच पण त्याचप्रमाणे ती आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अमेरिकेतही स्थापन होईल. कारण लोकशाहीची राजवट सौम्य आणि सुखावह असते. माणसांच्या आणि समाजाच्या सुधारणेचा विचार करीत असताना आगरकर असे मत प्रतिपादन करतात की, समाजात लोकसत्ताक राज्य प्रस्थापित होणे ही खरी सुधारणा आहे.[१३]

आगरकरांच्या विचारात लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता, संमती या तत्वाचा विशेष प्रभाव जाणवून येतो. माणसांस स्वभावत: स्वातंत्र्य सुखावह वाटते आणि पारतंत्र्य दु:खावह असते. समाजात सर्वांच्या हितासाठी प्रत्येकजण आपल्या स्वातंत्र्याचा काही प्रमाणात संकोच करतो, पण हा संकोच करीत असताना त्याची दृष्टी सर्वांच्या कल्याणाची असते. आगरकर आत्यंतिक व्यक्तीवादाच्या विरोधी होते. **'सर्वांना समान स्वातंत्र्य'** हा सिध्दांत व्यक्तीस्वातंत्र्य हे मूल्य म्हणून स्वीकारल्याने ओघानेच येतो. आगरकरांनी आपल्या विचारप्रणालीत व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समतेचाही अंतर्भाव केला होता. सर्व मानवप्राणी जन्मत: सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणे हे केवळ त्यांच्या कमी अधिक बुध्दिविकासावर व उद्योगशिलतेवर अवलंबून आहे! म्हणून व्यक्तीच्या स्वतंत्र कर्तृत्वाला जास्तीत जास्त वाव मिळाला पाहिजे; तिच्या आकांक्षा आणि तिची उपक्रमक्षमता यावर कुठल्याही प्रकारचे कृत्रिम बंधन असता कामा नयेत, अशी त्यांची धारणा होती. मात्र समतेचे तत्व अंगीकारले म्हणजे सर्व माणसे सारख्या गुणवत्तेची होतील किंवा त्यांना सारखी जीवनसमृध्दी लाभेल असे नाही. समता याचा अर्थ सर्वांना समान हक्क, समान संधी. आगरकर असे मत व्यक्त करतात की, खऱ्या स्वतंत्र समाजात व्यक्ती–व्यक्तीतील परस्पर संबंध बलात्काराच्या आधारावर बनविले जात नाहीत तर ते

संमतीच्या आधारावर उभे असतात. आता संमतीच्या आधारावर काम करणे महत्वाचे आहे.

स्वातंत्र्याचे, समतेचे, संगतीचे तत्व माणसां-माणसांच्या संबंधात रुढ झाले म्हणजे निरनिराळी कामे करणारी लोक, राजा व प्रजा, अधिकारी व जनता, पिता व पुत्र, गुरु व शिष्य, पति पत्नी इत्यादी सर्व सबंधाना निराळे स्वरुप प्राप्त होते, आणि आगरकरांच्या विचारात या सर्व संबंधाना निराळे स्वरुप आणण्याचा जे प्रयत्न आहे त्यातील बीज तरी हेच आहे. समाज एकत्र नांदण्याला काही शासन व कोणीतरी रास्ता पाहिजे पण समाजाच्या प्रगतीचे लक्षण म्हणजे हे शासन व हे शास्तृत्व उपरोक्त तत्वांना अनुसरुन परिणत झाले पाहिजे आणि अशा प्रकारे राज्यसंस्थेचे योग्य स्वरुप म्हणजे प्रजासत्ताक किंवा प्रजेच्या संमतीने वा मर्जीने चालणारे हे होय.[१४] आगरकरांच्या राजकीय विचारांच्या मुळाशी, "**राज्यसत्तेचा अंमल शक्य तितका कमी असावा, लोकांनी होता, होईतो स्वायत्त असावे,**" हे तत्व नि:संशय होते व ते व्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वाला अनुसरुन होते.

नवीन कल्पना आणि तंत्रे घडवून त्यांची कसोटी घेण्याचे स्वातंत्र्य जर समाजातील व्यक्तींना नसेल तर वैज्ञानिक प्रगती कुंठीत होईल आणि सामाजिक जीवनाच्या बौध्दिक क्षेत्रात जर व्यक्तींना स्वातंत्र्याचा लाभ घेता येत असेल तर अन्य क्षेत्रात त्यांना स्वातंत्र्य नाकारणे कठीण होईल. लोकांवर काही विशिष्ट आचार आणि मते लादणारी अधिकारपदे जर समाजात असतील तर स्वतंत्रपणे विचार करुन नवीन कल्पना लढविण्याची आणि त्यांचे परीक्षण करण्याची लोकांची प्रवृत्ती क्षीण होईल. उलट लोकांना विचार स्वातंत्र्य असेल तर वैज्ञानिक प्रगतीला चालना मिळेल. समाजात वैज्ञानिक ज्ञान आणि त्यावर आधारलेले तंत्रज्ञान वाढले तर नवीन उत्पादन तंत्रे विकसित होऊन वापरली जातील. शेती आणि लहान प्रमाणावरील कारागीर यांच्यावर आधारलेल्या समाजाचे औद्योगिक समाजात रुपांतर होईल. औद्योगिक समाजात उत्पादनाचे, व्यापाराचे, वितरणाचे जे

व्यवहार असतात ते शेती प्रधान समाजातील व्यवहारापेक्षा अधिक प्रमाणत: करारावर, उभय संमतीवर आधारलेले असतात व म्हणून ते स्वातंत्र्याला पोषक असतात, **"पारधी वृत्ती, धनगर वृत्ती, शेतकरी वृत्ती आणि व्यापार वृत्ती" (औद्योगिक वृत्ती)** अशा मनुष्य धारणेच्या चार वृत्ती झाल्या. जी कुटुंबे व राष्ट्रे या चार वृत्तीतून गेलेली असतात ती बरीच सुधारलेली असतात. अर्थात आगरकरांच्या दृष्टीपुढे ब्रिटन, फ्रान्स इत्यादी औद्योगिक, विज्ञानात प्रगत आणि लोकशाहीवर आधारलेली राष्ट्रे सुधारलेल्या प्रगत राष्ट्राची मॉडेल्स म्हणून होती.[१५]

मानवजातीमध्ये जो अंतर्गत जीवन संघर्ष चालत असतो त्यांचा निर्देश आगरकरांनी केला आहे. विशिष्ट समाजात अधिकारी वर्ग आणि त्यांच्या अंकित असलेल्या वर्ग यांच्यामधील हा संषर्घ असतो. भिन्न समाजामध्येही हा संघर्ष चालतो. पण माणसाच्या विवेकशिलतेमुळे मानवजातीत संघर्षाऐवजी सहकार्य नांदू शकेल असा विश्वासही ते प्रकट करतात. ".... सर्व देशात राजसत्ता लोकांच्या किंवा लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधीच्या हातात असून तिची मर्यादा अत्यंत संकुचित असेल व तिचा अंमल अतिशय सुखदायक व सौम्य असेल. प्रथम युरोप खंडातील सर्व देशात लोकसत्तात्मक राज्यांची दृढ स्थापना होईल व पुढे आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रलेशिया वगैरे सर्व लहानथोर खंडात व बेटात लोकसत्ताक राज्य स्थापनात येतील; हे सर्व झाल्यावर ज्या ज्या लोकसत्ताक राष्ट्राची काही कारणामुळे विशेष मैत्री झाली असेल त्याचे पृथक राष्ट्रीय समूह होतील व असे होता होता अखेरीस पृथ्वीवरील सर्व लोकसत्तात्मक राष्ट्राचे एक राष्ट्र झाल्यासारखे होवून सर्व देशातील सर्व प्रकारचे लोक एकमेकांशी सहोदराप्रमाणे वागू लागतील." ह्या भविष्याला आगरकरांनी **'तत्त्ववेत्यांची स्वप्नसृष्टी'** असे म्हटले आहे पण ते स्वप्न सत्य सृष्टीत उतरण्याची शक्यता ते नाकारीत नाहीत.[१६]

आगरकरांचे राजकीय बंधनविषयक विचार :-

'राजकीय बंधन व राजकीय आज्ञापालन' या विषयावर आगरकरांनी आपले विचार **'डोंगरीच्या तुरुंगात १०१ दिवस'** या पुस्तकांत मांडले.

'सत्यमेव जयते' वा 'सत्याचाच जय होतो!' हा जो पूर्वापार सिध्दांत आहे त्याची पूर्तता व्हावयास वेळ लागतो. कारण सत्यास स्वत:चे असे नैतिक सामर्थ्य असत नाही. तसे असते तर त्यास लगेच यश आले असते. कधी ना कधी सत्याचा पगडा बसतो याचे कारण इतकेच की सत्यावलंबन बहुतेकांच्या फायद्याचे आहे. असे वाटणाऱ्या या बहुतेकांचे ज्या वेळेस प्राबल्य होते त्या वेळेस सत्याचा जय होतो. जो गट सत्तारुढ असतो त्याच्या चुकीच्या धोरणास लोक दंडाच्या भयाने नावे ठेवीत नाहीत. पण नंतर मात्र त्या बाबत चिकित्सा होते. कारण अधिकाऱ्याविरुध्दचा संघर्ष आपणास शिर तळहातावर घेऊन करावा लागतो.[१७] व्यक्तीस्वातंत्र्य हे एकदा मूल्य म्हणून स्वीकारले की,' **सर्वांना समान स्वातंत्र्य'** हा सिध्दांत ओघानेच येतो. त्यानुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याला आपोआपच काही मर्यादा पडतात; आणि या मर्यादांचे व्यवस्थित पालन व्हावे याकरिता सामाजिक बंधनाची आवश्यकता उत्पन्न होते. दुसऱ्यावर हल्ला करण्याचा, त्याला लुबाडण्याचा, त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा कुणालाच हक्क पोहोचत नाही. समाजबंधने ही विधिरुप आणि निषेधपर अशी दोन प्रकारची असतात असे आगरकर म्हणतात.

जनतेने कायदे अवश्य पाळावेत कारण त्याशिवाय समाजात शांती नांदणार नाही. समाजाचा विकास होणार नाही, पण एखादा कायदा जर जुलमी असेल तर त्या कायद्याविरुध्द एकदम उठाव न करता त्यामध्ये सनदशीर मार्गाने फेरबदल होईपर्यंत त्यापासून होणारी पीडाही सहन केली पाहिजे. पण दंडाच्या, तुरुंगाच्या व शिक्षेच्या भयाने कायद्याचा जुलूम वर्षानुवर्षे सहन करणे चुकीचे आहे. सरकारचा अंमल न तोडणे हे जितके

प्रशंसनीय आहे तितकेच भेकडपणामुळे युगानुयुगे पारतंत्र्यात राहणे मनुष्यत्वास लाजिरवाणे आहे.[१८] त्यामुळे राज्याचा जुलूम व्यक्तीने सहन करु नये असे आगरकरांचे मत होते.

आगरकरांची आदर्श राज्याची कल्पना :-

आगरकर मानवजातीच्या भवितव्याबद्दल आशावादी आहेत. त्यांच्या मते, ज्ञानप्रसाराने लोकांची मनोभूमिका बदलेल. प्रेम, ज्ञान आणि सौजन्य यात वाढ होईल.

आगरकरांच्या मते सर्व राज्य व्यवस्था हळूहळू सौम्य व सुखकारक होणार आहेत. लोकसत्ताक राज्य ही सौम्य व्यवस्था आहे. या राज्यात समाजात विषमता कमी असते. समाजामध्ये विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे उत्पादक असे तीन वर्ग असतात. या तीन वर्गात सध्या बरेच अंतर आहे. पण या तीन वर्गातील अंतर कमी होण्यातच सुधारणेचे रहस्य आहे. सर्वांची बुध्दी व क्षमता सारखा नसल्यामुळे प्रत्येक जण कामात कुशल होण्याची शक्यता कमी आहे. पण सध्या वर्गावर्गात व स्त्री-पुरुषात जे अंतर पडले आहे ते बरेचसे कमी करता येण्यासारखे आहे.

आगरकरांचे असे मत होते की, अशा आदर्श राज्यात कोणत्याही व्यक्तीस उदरनिर्वाहासाठी इतरांच्या तोंडाकडे बघावे लागणार नाही. तो दिवसातील काही वेळ आत्मचिंतनासाठी, शास्त्राच्या अभ्यासासाठी, मनास रुचेल ती करमणूक करण्यासाठी किंवा विश्रांतीसाठी राखून ठेवेल.[१९]

मागास समाजाच्या विकासासाठी या समाजात आधुनिक लोकसत्ताक अवस्था व संमतीवर आधारलेले सामाजिक संबंध विकसित झाले पाहिजेत असे आगरकरांचे मत होते.

विवेकनिष्ठ राष्ट्रवाद :-

आगरकर हे राष्ट्रीय वृत्तीचे विचारवंत होते. महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या इतिहासात कै. आगरकर यांचे एक विशिष्ट स्थान आहे. शुध्द विवेकवादाच्या आधारावर जहाल राष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी १८८० पासून १८९५ पर्यंतच्या काळात केला. त्यांच्या कार्याचे व धोरणाचे व स्वरुप त्यांच्या पुढील उद्‌गारावरुन समजून येईल. ते म्हणतात, "इंग्रजी ज्ञान, इंग्रजी स्वातंत्र्य, इंग्रजी ऐषआराम, इंग्रजी स्त्री पुरुषांचे बरोबरीचे वर्तन, अननुभूत रुची, इंग्रजी खाना व चित्तास उल्हास देणारी इंग्रजी पेये इत्यादिकांनी आमच्या सुशिक्षितांचा पहिला घाणा दिपून वेडावून, भांबावून गेला! पण तो मनू आता बदलत चालला आहे. जेवढे साहेब लोकांचे तेवढे चांगले आणि आमचे गचाळ असे मानण्याचा परिपाठ कमी होत आहे व काही देशाभिमानी सुशिक्षितांत तर अगदी उलट रितीने विचार करण्याचा प्रघात पडू लागला आहे, आणि न जाणो कदाचित काही दिवसांनी हे आणखी एक नवीनच लचांड आमच्या पाठीमागे लागले की काय अशी भीती वाटू लागली आहे. एकदा देशाभिमानशुन्यता आमच्या विव्दानास आली होती! आता कित्येकास देशाभिमानतिरेक घेरु लागला आहे! आम्हास हे दोन्हीही पंथ मान्य नाहीत. आमच्या मते खरी वाट या दोहोच्यामधून जाते व याच वाटेने चालत राहण्याचा आमचा ईरादा आहे." या उताऱ्यावरुन आगरकरांचा राष्ट्रवाद हा **'विवेकनिष्ठ राष्ट्रवाद'** आहे असे जाणून येते. वास्तवलक्षी विवेकनिष्ठ व्यक्तीवाद हे आगरकरांच्या राष्ट्रविषयक विचारांचे प्राणतत्व होते.

'गुलांमाचे राष्ट्र' या लेखात आगरकरांनी भारतात राष्ट्रवाद का निर्माण होत नाही. या संदर्भात पुढील उद्‌गार काढलेत ते म्हणतात की, "राष्ट्राचे ऐक्य होण्यास लागणारा एकतरी गुण आम्हात भरपूर आहे काय? धैर्य नाही; उत्साह नाही; बल नाही; ज्ञान नाही; तर्क नाही; उद्योग नाही; कला नाही; खरा देशाभिमान नाही; खरी धर्मश्रध्दा नाही; तर्क नाही; खरे बोलण्याची किंवा खरे आचरण करण्याची सवय नाही; सारांश चांगले असे

काही नाही. ज्याची त्याची अहोरात्र वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टी लागली असल्यामुळे आपल्या विचारांचा, आचाराचा भावी संततीवर काय परिणाम होईल याचा कोणीही विचार करत नाही." [२०]

'ज्या देशांत आपले शेकडो पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले, ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टीत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक उदाहरणांचे फळ आपणास ऐतेच प्राप्त झाले अशा देशातील धर्माचा, रितीरिवाजाचा व लोकांचा सर्वथैंव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधीही शोभणार नाही. स्वभूमीत, स्वलोकांत, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवाच्या निंदेस किंवा छळास न भीता त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तीवाद करुन, कधी लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे' आगरकरांच्या या विचारांवरुन त्यांच्या राष्ट्रवादाचा खरा अर्थ स्पष्ट होतो.

उच्चवर्णीय सुशिक्षितांत येथे सामाजिक प्रबोधनाचे जे कार्य चालू होते त्याची मुख्य प्रेरणा राष्ट्रवादाची होती. त्यात 'नेमस्त' व 'जहाल' असे दोन विचारप्रवाह होते. आगरकर हे समाजसुधारक होते. तरी येथील सुधारक पक्षाच्या नेमस्तपणाचे त्यांना वावडे होते. त्यांची स्वत:ची मते जहाल असूनही जहालांचा सुधारणाविरोध त्यांना मुळीच पटत नव्हता. त्यामुळे कोणत्याही रुढ संप्रदायात ते चपलख बसू शकले नाहीत, शिवाय शब्दप्रामाण्य आणि विचारस्वातंत्र्य, परंपरा आणि व्यक्तीप्रेरणा या परस्परविरोधी तत्त्वांचा समन्वय साधण्याच्या प्रयत्नांमधून तत्कालीन सुधारणावादात आलेली विसंगती त्यांनी आपल्या तत्त्वप्रतिपादनात कधी येऊ दिली नाही. जहाल राष्ट्रवादाला सर्वांगिण सुधारणावादाची जोड देऊन आगरकरांनी राष्ट्रवादी तत्त्वविचारांची अधिक शुध्द व सदृढ पायावर स्वतंत्रपणे बांधणी केली; आणि त्याची संयुक्तिकता, औचित्य आणि इष्टता लोकांना पटवून देण्यासाठी ते शेवटपर्यंत एकाकी धडपडत राहिले. [२१]

आपल्या जीवनकलहाविषयक सामाजिक तत्वज्ञानाचा विकास करीत आगरकरांनी व्यक्तीस्वातंत्र्य लोकशाही, स्त्रीसुधारणा, सामाजिक व राजकीय सुधारणा आणि राष्ट्रवाद या विषयावर विचार मांडलेले आहेत. आगरकर हे लोकशाही राज्याचे पुरस्कर्ते होते कारण या राज्यातच लोकांना खऱ्या अर्थाने व्यक्तीस्वातंत्र्याचा लाभ होईल आणि व्यक्तीविकास घडवून आणता येईल असे त्यांचे मत होते. त्याचप्रमाणे स्त्रीपुरुष समानता महत्वाची असून स्त्रीयांना सर्व प्रकारचे अधिकार दिल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. आगरकर सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते होते, त्यासाठी चळवळ केली पाहिजे असे मत होते. सुधारणेसाठी लोकजागृती आवश्यक आहे. त्याचबरोबर अत्यंत अन्यायी अशा रुढीच्या विरुध्द लोकांच्या धर्मामध्ये हस्तक्षेप करुन सरकारने कायदे करावे असे त्याचे मत होते. त्याचबरोबर सुधारकानी लोकांच्या रुढीप्रियतेला न कंटाळता त्याच्यामते सातत्याने काम केले पाहिजे. सुधारक जर त्यापासून दूर जातील तर त्यांची वेगळी जात होईल म्हणून समाजाच्या कितीही रोष झाला तरी त्याला सहन करुन समाजामध्ये राहून समाजाच्या सुखदु:खाशी समरस होऊनच आपल्याला सुधारणा घडवून आणाव्या लागतील असे त्यांचे मत होते. त्यातूनच राष्ट्रीय भावनेचा विकास होईल असे त्यांना वाटते.

सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा ह्या एकमेकांत असून भिन्न नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्या एकमेकांशी जोडलेल्या आहेत. त्याचा राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद होता. भारतामध्ये सर्व जातीच्या धर्माच्या लोकांनी गुण्यागोविंदाने राहावे त्यांनी सर्व प्रकारचे अधिकार असावेत, असे त्याचे मत होते. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्वार्थाचा त्याग करुन देशभक्तीची भावना वाढीस लावावी असे त्याचे मत होते. यासाठी स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय व त्याप्रमाणे वागणे महत्वाचे आहे.

-: संदर्भ सूची :-

१. जावडेकर आचार्य
आधुनिक भारत
कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९३८, पृष्ठ नं.२१७

२. देशपांडे सुनंदा,
गोपाळ गणेश आगरकर (प्रथमावृत्ती)
श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८३, पृष्ठ नं. १३८

३. देशपांडे सुनंदा,
गोपाळ गणेश आगरकर (प्रथमावृत्ती)
श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८३, पृष्ठ नं. १४३

४. देशपांडे सुनंदा,
गोपाळ गणेश आगरकर (प्रथमावृत्ती)
श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८३, पृष्ठ नं. १६९

५. आळतेकर मा.दा. (सं)
संपूर्ण आगरकर भाग-दोन
प्रकाशक-मॉडर्न बुक डेपो, पुणे १९४७,
पृष्ठ नं.७८

६. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं.१११

७. आळतेकर मा.दा. (सं)
संपूर्ण आगरकर भाग-दोन
प्रकाशक-मॉडर्न बुक डेपो, पुणे १९४७,
पृष्ठ नं.१२६

८. बाळ विद्या,
आजचा सुधारक, आगरकर विशेषांक,
जून-जुलै १९९५, पृष्ठ नं.१०१

९. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं.१२२

१०. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं.१२६

११. देशपांडे सुनंदा,
गोपाळ गणेश आगरकर (प्रथमावृत्ती)
श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८३, पृष्ठ नं. १७९

१२. रेगे मे. पुं.,
आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान, नवभारत,
ऑक्टोंबर १९९८, पृष्ठ नं.७

१३. चौसाळकर अशोक,
आगरकरांचे समाजशास्त्र,
आजचा सुधारक आगरकर विशेषांक,
जून-जुलै १९९५, पृष्ठ नं.१०९

१४. आळतेकर मा.दा. (सं)
गोपाळ गणेश आगरकर चरित्रात्मक निबंध,
प्रकाशक- मंगेश नारायण कुलकर्णी,
मालक भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई नं.२, १९३०
पृष्ठ नं.३१३

१५. रेगे मे.पुं.,
आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान नवभारत,
ऑक्टोंबर १९९९ पृष्ठ नं.७

१६. रेगे मे.पुं.,
आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान नवभारत,
ऑक्टोंबर १९९९ पृष्ठ नं.१३

१७. चौसाळकर अशोक(सं)
टिळक आणि आगरकर यांचे राजकीय विचार
राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर २००८, पृष्ठ नं.१३७

१८. चौसाळकर अशोक(सं)
टिळक आणि आगरकर यांचे राजकीय विचार
राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर २००८, पृष्ठ नं.१३८

१९. चौसाळकर अशोक
आगरकरांचे राजकीय विचार
लोकवाङ्.मय गृह, मुंबई २००५, पृष्ठ नं.३१

२०. आळतेकर मा.दा. (सां.),
संपूर्ण आगरकर भाग–एक
प्रकाशक–मॉडर्न बुक डेपो, पुणे १९४८,
पृष्ठ नं. १८८

२१. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं.१७